शासनाच्या मालकीच्या विमानावरील कंत्राटी पध्दतीवरील हवाईसुंदरीच्या मानधनामध्ये वाढ करणेबाबत.

<u>महाराष्ट्र शासन</u>

सामान्य प्रशासन विभाग

शासन निर्णय क्र.विचासं-१११८/प्र.क्र.७८/ २८-अ

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय, मुंबई ३२.
दिनांक: ३ मे, २०१८.

<u>वाचा</u>: १) दिनांक ६/४/२०१८ च्या मा.शक्ती प्रदत्त समितीच्या बैठकीचे क्र.विचास-१११८/प्र.क्र.३५/२८-अ, दि.२३/४/२०१८ चे इतिवृत्त.
२) उपसंचालक, विमानचालन संचालनालय, जुहू विमानतळ, मुंबई यांचे पत्र क्र. डीए/ एडीएम/४३७/२०१८, दि.२५/४/२०१८ चे पत्र

<u>प्रस्तावना :</u>

विमानचालन संचालनालयामार्फत राज्याच्या अतिमहत्वाच्या व्यक्तींच्या हवाई प्रवासाची व्यवस्था पाहिली जाते. राज्याच्या अतिमहत्वाच्या व्यक्तींच्या हवाईप्रवासाकरीता मे.ॲरो एअरक्राफ्ट सेल्स अँड चार्टर्ड प्रा.लि. या कंपनीमार्फत विमानचालन सेवा पुरविण्यात येतात तसेच हवाई सुंदरीची सेवा पुरविण्यात येतात. केंद्र शासनाच्या डी.जी.सी.ए.चे प्रशिक्षण घेऊन परवान्याचे नुतनीकरण करुन घेऊन हवाई सुंदरीच्या सेवा उपलब्ध करुन दिल्या जातात. सन २००९ पासून हवाई सुंदरीस प्रत्येक दौ-याकरीता रु.५,५००/- इतके मानधन देण्यात येते. त्यानंतर अद्यापपर्यंत त्यांच्या मानधनात वाढ केलेली नसल्यामुळे विमानचालन संचालनालयाने विमानचालन सेवा पुरविणा-या (Ground Handling Agency) कंपनीमार्फत हवाई सुंदरी यांच्या प्रत्येक दौ-याकरीता रु.११,०००/- इतके मानधन करण्याबाबतचा प्रस्ताव शक्ती प्रदत्त समितीसमोर निर्णयार्थ सादर केला होता. दिनांक ६/४/२०१८ रोजीच्या शक्ती प्रदत्त समितीच्या बैठकीत सदर प्रस्तावास अनुमती देण्यात आली आहे. त्या अनुषंगाने शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

शासन निर्णय :

शासनाच्या मालकीच्या विमानावरील कंत्राटी पध्दतीने नियुक्ती झालेल्या हवाई सुंदरीस विमानचालन व्यवस्थापन सेवा पुरविणा-या कंपनीमार्फत प्रत्येक दौ-याकरीता रु.११,०००/- इतके मानधन मंजूर करण्यात येत आहे.

२. याबाबतचा होणारा खर्च मागणी क्र.ए-४, "२०७०-इतर प्रशासकीय सेवा (११४) परिवहन साधनांची खरेदी व परिरक्षण (००) (०२) विमान चालन विषयक सल्लागार, महाराष्ट्र शासन (अनिवार्य) २०७० ०१५६" या लेखाशिर्षातंर्गत ५०-**इतर खर्च** या उद्दिष्टाखालील सबंधित आर्थिक वर्षात उपलब्ध अर्थसंकल्प तरतूदीतून भागविण्यात यावा, व त्याच लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

३. या प्रकरणासाठी उप संचालक, विमानचालन संचालनालय, मुंबई यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून व संचालक, विमानचालन संचालनालय, मुंबई यांना नियंत्रक अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

४. सदरहू आदेश विमानचालन विभागाच्या विविध बाबींवर निर्णय घेण्यासाठी मा.मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील शक्ती प्रदत्त समितीच्या दि.६.०४.२०१८ रोजी झालेल्या बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार निर्गमित करण्यात येत आहेत.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०५०३१५४७२१५१०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

Sandhya Ashok Bageshwar

Digitally signed by Sandhya Ashok Bageshwar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=4d4a8d57e69da6499480bc974f18dca56ad5541c4795df9434c3e826318ec8ea, serialNumber=ba5a637883d7b445558182d1fd79c7e47a2d65e5094f71fb0ec8c5d23b0cc880, cn=Sandhya Ashok Bageshwar
Date: 2018.05.03 15:48:52 +05'30'

(सं.अ.बागेश्वर)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत ,

१. संचालक, विमानचालन संचालनालय, जुहू विमानतळ, मुंबई
२. महालेखापाल, (लेखा परीक्षा/ लेखा अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य, मुंबई.
३. उप सचिव, सामान्य प्रशासन विभाग (कार्या.२५), मंत्रालय, मुंबई
४. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
५. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
६. निवडनस्ती